XX-II

# संशोधन सारांश

**संशोधन शीर्षक :-**

''राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रम आणि त्याचे मराठवाडयातील औरंगाबाद जिल्हयातील ग्रामीण जनतेच्या सामाजिक परिवर्तनात योगदान.''

या विषयावरील संशोधकांचा शोधनिबंध शिक्षण क्षेत्रातील पीएच.डी. पदवीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे सादर करण्यात आला.

**संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे पुढील प्रमाणे निश्चित करण्यात आले. :-**

१) औरंगाबाद जिल्हयातील ग्रामीण भागातील राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमाच्या विकासाचा आढावा घेणे.

२) राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमामुळे प्रौढांच्या सामाजिक जीवनामध्ये झालेल्या बदलांचा शोध घेणे.

३) राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमाच्या उद्दिष्टांच्या सफलतेचा शोध घेणे.

४) राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रम अंमलबजावणीमध्ये येणा-या समस्यांचा शोध घेणे.

**प्रस्तुत संशोधनाच्या अनुषंगाने मांडण्यात आलेल्या कांही प्रमुख परिकल्पना पुढील प्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.**

**१) राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यकमाची निम्नलिखीत मुद्दयानुसार अमंलबजावणी झाली तर जनतेच्या सामाजिक जीवनात बदल घडून येईल.**

१) प्रौढ लाभार्थीची उपस्थिती

२) प्रौढ लाभार्थींच्या घरातील व्यक्तींचा समतोल आहार

३) प्रौढ लाभार्थींच्या जवळचा परिसर स्वच्छता

४) शौचालय उपलब्धता

५, लहान मुलांचे लसी करण

६) मुला - मुलींची वैवाहिक स्थिती

७) मनोरंजनाची साधने

८) वर्तमान पत्र वाचन

९) नेतृत्व व निवडणूक - ग्राम सभा सहभाग

१०) सणामधील सहभाग

११) ग्रामस्वच्छता उपक्रम

**२) राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमात प्रौढांचा सहभाग** वाढला तर त्यांचे **जीवनमान उंचावेल.**

१) स्त्री - पुरुष समानता

२) महिलांसाठी कुटीरोद्योग

३) महिलांचा विविध संस्थांमधील सहभाग.

उदा. बचत गट, ग्रामपंचायत

४) जीवनासाठी आवश्यक व्यवसाय मार्गदर्शन

५) बचत

६) पर्यावरण जागृती

७) शासन योजनांची अमंलबजावणी

८) व्यवसायामुळे आर्थिक परिस्थितीमध्ये झालेला बदल.

**३)  राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रम राबविताना निरनिराळया अडचणी येतात.**

१)  प्रौढ लाभार्थींची उदासीनता

२)  प्रौढ साक्षरता केंद्राची गैरसोयीची वेळ

३)  संघटक हे कार्यक्रमाशी कायम स्वरूपी जोडलेले राहत नाहीत.

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आला. औरंगाबाद जिल्हयातील शहरी विभाग सोडून इतर नऊ तालुक्यातील सर्व प्रमुख साक्षरता केंद्राची सहेतुक नमुना निवड करण्यात आले. गुच्छ न्यादर्शक पध्दतीचा वापर करून मुख्य केंद्राची सहेतुक निवड करण्यात आली. त्या मुख्य केंद्रातील प्रौढ लाभार्थींमधून ७० % लाभार्थींची निर्दिष्टांक नमुना म्हणून निवड केली. परंतु मुख्य प्रौढ साक्षरता केंद्र चालविणारे प्रेरक व त्या गावातील सरपंच यांची १०० % सहेतुक नमुना निवड करण्यात आली. तसेच औरंगाबाद जिल्हयाचे शिक्षणाधिकारी (निरंतर) शिक्षण)व नऊ तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी यांची १०० % सहेतुक नमुना निवड करण्यात आली.

संशोधनासाठी आवश्यक ती माहिती प्राप्त करून घेण्यासाठी प्रश्नावली व कार्यालयीन अभिलेख साधनांचा उपयोग करण्यात आला. प्राप्त माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी शेकडेवारी व सरासरी या सांख्यिकीय तंत्राचा अवलंब करण्यात आला. माहितीचे तात्काळ आकलन व्हावे या हेतूने आवश्यक त्या ठिकाणी स्तंभालेख, वर्तुळालेख, जोडस्तंभालेख व रेखालेख अशा आलेखच्या विविध प्रकारांचा उपयोग करण्यात आला.

**प्रस्तुत संशोधनाचे काही प्रमुख निष्कर्ष पुढील प्रमाणे :-**

१) सर्वच प्रौढ लाभार्थी प्रौढ शिक्षण केंद्रात उपस्थित राहत नाही.

२) समतोल आहाराविषयीचे मार्गदर्शन सर्वच प्रौढ लाभार्थींना मिळत नाही.

३) परिसर स्वच्छता, दररोज करण्याविषयी मार्गदर्शन सर्वच प्रौढ लाभार्थींना मिळत नाही.

४) ब-याच प्रौढ लाभार्थीत पर्यावरणा संदर्भात अनास्था दिसून येते.

५) बहुतांशी प्रौढ लाभार्थीकडे सांडपाण्याची योग्य व्यवस्था नाही.

६) लसीकरणाच्या फायद्यासंदर्भात ब-याच प्रौढ लाभार्थीमध्ये अज्ञान दिसून येते.

७) प्रौढ लाभार्थीचे नेहमी वर्तमानपत्र वाचनाचे प्रमाण कमी आहे.

८) ग्रामसभेत सर्वच प्रौढ लाभार्थी भाग घेत नाही.

९) पत्नीच्या नावने स्थावर मालमत्ता असणा-या प्रौढ लाभार्थींचे प्रमाण कमी आहे.

१०) घरातील महिलांचे कुटीरोद्योग करण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

११) प्रौढ लाभार्थींच्या घरातील मुला / मुलींनी माध्यमिक उच्च माध्यमिक, व्यवसाय शिक्षण घेण्याचे प्रमाण कमी आहे.

१२) काही प्रौढ लाभार्थी विविध व्यवस्याय मार्गदर्शनापासून वंचित असल्याचे दिसून येतात.

१३) ब-याचशा प्रौढ लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजना विषयीमाहिती नाही.

१४) शासकीय योजनांचा लाभ घेताना शासकीय कार्यालयातून कर्मचा-यांचा प्रतिसाद मिळत नाही.

१५) ग्रामस्वच्छता अभियानात सर्वच प्रौढ लाभार्थी सहभागी होत नाही.

प्रस्तुत संशोधनातून जे संकलित निष्कर्ष निघाले आहेत त्या निष्कर्षाच्या अनुषंगाने संशोधकाने पुढील प्रमाणे काही प्रमुख शिफारशी सुचविलेल्या आहेत.:-

१) प्रौढ शिक्षण केंद्रात सर्वच प्रौढ लाभार्थींनी यावे, यासाठी प्रौढ शिक्षण केंद्राचे वातावरण चांगले ठेवावे, जेणे करून प्रौढ लाभार्थी शिकण्यासाठी येतील व त्यात सातत्य राहील.

२) प्रौढ लाभार्थींना प्रौढ शिक्षण केंद्रातून समतोल आहारा विषयी मार्गदर्शन केले जावे जेणेकरून प्रौढ लाभार्थींना समतोल आहार म्हणजे काय व त्यामुळे आरोग्य कसे चांगले राहते याची कल्पना येईल.

३) परिसर स्वच्छता दररोज केल्याने कोणते फायदे होतात याविषयी प्रौढ लाभार्थींना माहिती देण्यात यावी.

४) पर्यावरणासंदर्भात सर्वच प्रौढ लाभार्थींमध्ये जाणीव जागृती निर्माण करण्यात यावी.

५) सर्वच प्रौढ लाभार्थींच्या घरी सांडपाण्याची व्यवस्था बंद गटारांद्वारे करण्यात यावी, याबद्दल प्रौढ लाभार्थींना मार्गदर्शन करून गटारी उघडया असल्यास रोगराई प्रसार होतो याबद्दलची जाणीव निर्माण करावी.

६) लसीकरण करतांना मुलगा अगर मुलगी असा भेदभाव न करता लसीकरणाचे फायदे प्रौढ लाभार्थींना समजून देण्यात यावे.

७) प्रौढ लाभार्थींनी नियमित वर्तमानपत्राचे वाचन करावे यासाठी प्रौढ शिक्षण केंद्रातून वर्तमानपत्र मिळण्याची सोय उपलब्ध करून देण्यात यावी.

८) ग्रामसभेत सर्वच प्रौढ लाभार्थींनी भाग घ्यावा यासाठी प्रेरक, सरपंच, गटशिक्षणाधिकारी यांनी सतत पाठपुरावा करावा.

९) स्त्रीयांना मालमत्तेमध्ये समानवाटा देण्यात यावा यासाठी पुरुष प्रौढ लाभार्थींचे उद्‌बोधन करण्यात यावे.

१०) सर्वच प्रौढ लाभार्थींच्या घरातील महिलांनी कुटीरोद्योग केल्यास त्यांना घर सांभाळून आर्थिक परिस्थिती सुधारण्यास हातभार लावता येईल व कुटुंबात व समाजात महिलांना प्रतिष्ठा प्राप्त होईल, त्यांना समान संधी दिले जाईल.

११) सर्वच प्रौढ लाभार्थींनी आपली मुले प्राथमिक शाळेत जातील व ती दर्जेदार शिक्षण घेतील याकडे लक्ष दिले पाहिजे. शिक्षणाचे प्रमाण वाढले तरच प्रौढ लाभार्थींची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.

१२) प्रौढ शिक्षण केंद्रातून सर्वच शासकीय योजनांची माहिती दिली जावी व त्या योजनांचा प्रौढ लाभार्थींना उपयोग झाला किंवा नाही याचा आढावा प्रौढ शिक्षण केंद्रातून काम करणा-या यंत्रणेने घ्यावा.

१३) प्रौढ लाभार्थींची शासकीय कार्यालयातून कोणत्याही प्रकारची अडवणूक होणार नाही, याची काळजी त्या कार्यालयातील वरील अधिका-यांनी घ्यावी.

१४) प्रौढ लाभार्थींना शासकीय योजनांचा लाभ व्हावा यासाठी शासकीय कार्यालयातील कर्मचा-यांनी त्यांना सहकार्य करावे. प्रौढ लाभार्थींची कोणतीही अडवणूक होणार नाही याची काळजी वरिष्ठ अधिका-यांनी घ्यावी.

१५) ग्रामस्वच्छता अभियानात सर्वच प्रौढ लाभार्थींचा सहभाग असावा. त्यासाठी प्रौढ शिक्षण केंद्रामार्फत वेगवेगळे उपक्रम राबविले जावेत.